E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# राजपुतांचे मराठवाड्यातील स्थलांतर

**डॉ. डिगांबर राधाकिसन जाधव**
इतिहास अभ्यासक,
**मो. नं. 9673345461**
**Email: digambarjadhav77@Gmail.com**

## प्रस्तावना :

मानवी समुदायाच्या इतिहासात स्थलांतर ही एक सातत्याने दिसून येणारी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीने अथवा लोकसमूहाणे भौगोलिक राजकीय व अप्रतिकात्मक सीमा पार करून दुसऱ्या प्रदेशात व लोकसमूहात कायमस्वरूपी वास्तव्य करण्याच्या प्रक्रियेला स्थलांतर असे म्हटले जाते. स्थलांतर हा लोकसंख्येच्या आकारात व रचनेत बदल घडवून शकणारा एक मूलभूत घटक असून जन्म आणि मृत्यू या दोन्ही घटका इतका महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र हा उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा दुवा असल्याने सामाजिक योग्यता हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य राहिले आहे. महाराष्ट्रात स्थलांतरित झालेला राजपूत समुदाय हा या वैशिष्ट्याचे उत्तम उदाहरण ठरलेले आहे.

राजपुताच्या भाटाकडील नोंदी राजपूत कुटुंबाच्या नोंदी ठेवणाऱ्या काही भाटाची कुटुंबे आजही मराठवाड्यात तसेच खानदेश भागात वास्तवास आहे. तसेच राजस्थान वरून जे दहा ते बारा वर्षांनी भाट अथवा जोगे येतात त्यांच्या जवळील हस्तलिखितामध्ये राजपुताचा शेकडो वर्षाचा इतिहास आजही सुरक्षित आहे.[1] त्यामुळे त्यांचे सूक्ष्मपणे जर अध्ययन केले तर त्यात राजपुताच्या स्थलांतराचा कालावधी व कारणांचा काही प्रमाणात उल्लेख सापडतो. जवळ जवळ 400 ते 500 वर्षांपूर्वी भारताने केलेल्या नोंदी त्यातील अक्षरे कागद लिखाण शैली त्यात कुटुंबप्रमुख व्यक्तीचा उल्लेख त्यानंतर त्यांच्या कुटुंबात चालत आलेली वंशावळी वेळोवेळी नोंदी करण्याच्या तारखा त्यांना मिळालेले मानसन्मान दक्षिण कुटुंबातील झालेले लग्न जन्ममृत्यूच्या नोंदी ह्या निश्चितच त्या त्या कुटुंबाची वा समुदायाची ऐतिहासिकता स्पष्ट करू शकतात. मराठवाड्यात राजपूत समुदायाचे विविध गट असले तरी प्रत्येक गटाचा वेगवेगळ्या भाट असून त्यांच्याकडे परंपरेने चालत आलेल्या हस्तलिखित यामध्ये खानदेशातील तसेच मराठवाड्यातील राजपुताच्या स्थलांतराला धागाचा सापडतो.

मध्ययुगीन कालखंडात शहराच्या गाथा सांगणारे कवी म्हणून भाटांची ओळख होती. त्यांची पर्यत्नपूर्वक वेगवेगळ्या कुटुंबाची वेळोवेळी माहिती संकलित करून त्यांच्या नोंदी या अद्यावत ठेवले

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

आहेत. त्यामुळे सध्याच्या पिढी स्वतःचे पूर्वज कुलदेवता वा कुळे यांच्या बद्दल माहितीची उदासीनता असू नये. केवळ याच नोंदीमुळे विविध कुळांची संगतवार माहिती उपलब्ध होते. त्यामुळे भाटाच्या नोंदीकडे एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहणे भाग पडते. राजपूत समुदायाच्या विविध भाटाकडील नोंदीनुसार खानदेशात प्रामुख्याने चौदाव्या आणि पंधराव्या शतकापासून राजपुताचे स्थलांतरास सुरुवात झाली व कालांतराने त्यात हळूहळू वाढ होत गेली. स्थलांतराचे पर्व अगदी आधुनिक काळापर्यंत येऊन मिळत असल्याचे लक्षात येते.

इसवी सन 1526 मध्ये दिल्लीच्या तक्त्यावर मोगलांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी भारताच्या इतर प्रदेशातही राज्य विस्तार करण्यास सुरुवात केली. दिल्लीपासून राजस्थानचा भूप्रदेश जवळच असल्याकारणाने मोगल यांनी राजपुतानावर आपले लक्ष केंद्रित केले. त्याकाळी राजपुताना हे महत्त्वाचे लष्करी सामर्थ्याचे केंद्र म्हणून गणल्या जात असे. मात्र हळूहळू मोगलांचे सामर्थ्य वाढल्याने राजपुतांचा त्यांच्यापुढे निभाव लागेल असा झाला. तेव्हा काहींनी नाईलाजाने मोगला पुढे शरणागती पत्करली. तर काहींनी जवळच्याच पहाडी भागात असरे घेतला. तेथूनच ते आक्रमकाशी लढत राहिले.

पुढे पुढे मोघलांच्या ताब्यात गेलेला प्रदेश परत मिळवणे अशक्य असल्याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी शरण जाण्यापेक्षा जंगलातच आपले वास्तव्य बसविले. राजस्थानला लागूनच असलेल्या अरवली आणि विंध्ये या पर्वता राजींच्या क्षेत्रात त्यांनी आश्रय घेतला. त्यानंतर भूमीत प्रवेश केल्याचा कयास आहे. राजपुताच्या या स्थलांतराचा विचार केल्यास ते राजस्थानातून पावागढ, कवांत तसेच राजपिपलाच्या टेकड्या द्यायच्या परिसरात व तेथून पुढे दोन मार्गाने त्यांचे स्थलांतरित झाले. एक म्हणजे नर्मदा खोऱ्यातून मध्य प्रदेशातील मतवाड, करणपुरा, निमाड तर दुसरा मार्ग म्हणजे राजदीपला टेकड्यातून नर्मदा खोरे ओलाडून ते खानदेशात आले. याशिवाय असिर्गड, बाबूरामपुर या मार्गेही काही राजपूत कुटुंबाचे दक्षिणेत आगमन झाले असल्याची माहिती प्राप्त होते.

इतिहासातील संदर्भानुसार खानदेशातील फारुकी राजवटीच्या काळात राजपूत समुदायाचे मोठ्या प्रमाणावर आगमन झाल्याची माहिती मिळते. खानदेशावर सर्वाधिक काळ फारुकी घराण्याची राजवट होती. इ.स. 1370 ते 1601 या फारुकी राजे यांनी आपल्या सैन्यांमध्ये विविध संदर्भ लढवा या गटाचा समावेश केलेला होता.[2] राजपूत समुदाय हा स्वामीभक्त असल्याने त्यांना फारुकी राजांनी सेनेत प्राधान्य दिले असल्यामुळे फारुकी राजांनी सैन्यातूनही राजपूत समुदायाचे या भागात आगमन झाल्याचे संदर्भ सापडतात.[3] राजपूत समुदायाचा भाटाकडील हस्तलिखित पाहिल्यास त्यातही या समुदायाचे 14 ते 16 व्या शतकात आगमन झाल्याचे उल्लेख सापडतात. त्याचा एक सबळ पुरावा म्हणजे या

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

समुदायाची मोठ्या प्रमाणावर वस्ती असलेल्या खंडाळा तालुका, भुसावळ या गावात 1515 मध्ये शिवाजी पाटील नावाचा राजपूत गृहस्थ सर्वप्रथम आल्याची नोंद त्यांच्याकडील वंशावळ दिसून येते.[4] याच काळात इतर गावांमध्येही राजपूत समुदायातील पूर्वज आल्याची नोंद भाटाच्या हस्तलिखित मध्ये निदर्शनास येते. खानदेशात काही राजपूत कुटुंबे गुजरात प्रांतातून आले असून त्यात सिसोदीया, कच्छवा, जाधव, पवार, सोळंकी, परमारशी आडनावे असलेल्या कुटुंबाचा भरणा दिसून येतो. तर काही राजपूत कुटुंबे बुरानपुर, पाल, सईदवा, राजपिपला मार्गेही मध्ययुगीन दख्खन आजच्या खानदेशात आली आहेत. त्यात प्रामुख्याने चव्हाण, तोमर, कछवा, हाडा सोळंकी यांचा समावेश होतो. राजपुताच्या स्थलांतरामागे शोध घेतल्यास धार्मिक गडांतर इत्यादी कारणे काही प्रमाणात कारणीभूत असले तरी तत्कालीन काळात सतत पडलेले भयानक दुष्काळ, रोगराई नैसर्गिक आपत्ती तसेच सैनिकी मोहिमाही कारणे सुद्धा लागू पडतात.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता राजपुताचे दक्षिणेतील स्थलांतराची कारणे दिसून येतात. मध्ययुगीन कालखंडात कर्तबगार सुलतान म्हणून ख्याती प्राप्त अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीच्या तख्तावर अरुढ होण्यापूर्वी 1296 मध्ये दक्षिणेची मोहीम हाती घेतली. त्याने विंध पर्वताच्या रांगा ओलांडून विदर्भातील एलीजपुर मार्गे दक्षिणेतील लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असलेल्या देवगिरी या अत्यंत दुर्गम किल्ल्यावर हल्ला केला. देवगिरी उर्फ दौलताबाद या नावाने ओळखला जातो. हा किल्ला त्याकाळी क्षेत्रफळ आणि रचनेचे दृष्टीने भारतातील अभ्यद म्हणून प्रख्यात होता. डोंगराच्या शिखरावर बसलेल्या आणि विस्तीर्ण तटबंदी गुबंद आणि खंडकांनी वेढलेल्या या किल्ल्यावर त्यावेळी यादव सिंह राजा रामचंद्र याची सत्ता होती.[5] अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर केलेल्या आक्रमणात यादवांचा पराभव झाला. पराभूत झालेल्या रामचंद्र कडून अल्लाउद्दीन खिलजीने सहाशे मन सोने, सात मन मोती, दोन मन लाल, 1000 माणसांनी 410 रेशीम त्यासोबतच काही हिरे, मोती आणि रोकड घेऊन संधी केली. तसेच राजा रामचंद्र याने दरवर्षी सुलतानाला खंडणी द्यावी असा करार करीत उत्तरेचा मार्ग धरला. अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणेच्या स्वारीच्या निमित्ताने उत्तरेकडील तुर्कांनी व इतर सरदारांना दक्षिणेतील सुपीक प्रदेशाची आणि तेथील ऐश्वर्याची प्रथमच माहिती झाली होती.

दक्षिणेतील नैसर्गिक सुबत्ता शांतता व साम्राज्य विस्तारासाठी मिळणारी मोकळीक ह्या गोष्टी प्रकर्षाने त्यांच्या लक्षात आल्या होत्या. या आकर्षणातून अनेकांनी नंतरच्या काळात विविध मोहिमाद्वारे व अन्य कारणामुळे दक्षिणेत येण्याचा मार्ग धरला व त्यातील काही पुढे कालांतराने राजपूत याच भूप्रदेशात स्थिर झाले आहे. अल्लाउद्दीन खिलजीच्या वेळी चित्तोडच्या पत्नानंतर मेवाड राजवंशी

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

आणि एकमेव उत्तर अधिकारी रावत अजय सिंह हे कुंभलगडांच्या पायथ्याशी त्यांच्या राज्यकारभार चालवीत होते. मेवाडचे स्वरूप महत्वपूर्ण प्राप्त करण्याचा त्यांच्या प्रयत्न होता. त्यासाठी त्यांचे जेष्ठ बंधू आणि अजय सिंह यांचे पुत्र हमीर यांच्या अंगी असलेले शौर्य आणि पराक्रम पाहून अजयसिंहाने हमीरांना उत्तराधिकारी बनवण्याचा निर्णय घेतला.[6]

याच काळात महाराणा हमीरांनी अल्पावधीत मोठ्या सीताफिने चित्तोड जिंकून त्यावर पुन्हा राजपुताची सत्ता प्रस्थापित केली. असे असले तरी महाराणा हमीर यांना मेवाडचे उत्तर अधिकारी पद मिळाल्यामुळे अजय सिंह त्याचे पुत्र सज्जन सिंह क्षेत्रसिंह हे दक्षिणेत आले. त्यावेळी खानदेशाला लागून असलेला दौलताबाद या किल्ल्याच्या परिसरात बहमणी साम्राज्याचा संस्थापक हसन गंगू यांच्याकडून दहा गावाची जहागिरी प्राप्त झाली होती.[7] त्यांनी पर्यायानेच याच भागात त्यांचे वास्तव केले. त्यांच्या समवेत त्यांचे काही विश्वासू सहकारीही दक्षिणेत आले व ते सुद्धा याच ठिकाणी स्थायिक झालेत. त्यातूनच काही राजपूत कुटुंबे कालांतराने खानदेशात आले असल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सज्जनसिंह, क्षेत्रसिंह यांचा मेवाडचा प्रदेश सोडून दौलताबाद परिसरातील आगमन आणि येथील संस्कृतीशी समरस होण्याची बाब ही राजपुताच्या दक्षिणेतील आगमनाचा एक सबळ पुरावा म्हणून ग्राह्य धरणे क्रम प्राप्त होते. मोहम्मद तुगलकाने इ.स.

१३२६ ते २७ मध्ये दिल्ली येथील राजधानी दक्षिणेत दौलताबाद देवगिरी येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी दिल्ली येथील राजधानी सोडून दक्षिणेत येण्यास अनेक सरमजमदार राज्यव्यवस्थेतील अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य जनता तयार नव्हती. मात्र मोहम्मद तुगलकाने सक्तीने सर्वांना स्थलांतरित होण्यास भाग पाडले जे येण्यास तयार झाले नाहीत त्यांना जबरदस्तीने आणण्यात आले होते. मुसलमान इतिहासकार इब्नबतूता यांनी लिहून ठेवले आहे की देवगिरीस जाण्यास नकार देणाऱ्यास फरपटत नेले होते तर एका आजारी माणसाला तर गोपनीतून दगड भिरकावा तसे भिरकावून दिले होते. या स्थलांतराची अत्यंत हृदयदायक वर्णने आहेत.

दिल्लीहून स्थलांतर करताना अनेक सरदारांनी राज्यव्यवस्थेतील अधिकारी तसेच सर्वसामान्य लोकांनी आपली मालमत्ता त्यागुण दक्षिणेचा मार्ग धरला होता. या दक्षिणेच्या स्थलांतराच्या वेळी किती जणांना दुखापती झाल्या कित्येक कित्येकांना त्रास झाला तरी किती मेले याची गणती नव्हती.[8] देवगिरी येथे राजधानी स्थापन केल्यावर सुलतान मोहम्मद तुगलकाने थोड्या दिवसात देवगिरीवरून दिल्लीला परत राजधानी नेण्याचा निर्णय घेतला. परिणामी दिल्ली सोडून आलेल्यांना पुन्हा अतोनात कष्ट सहन करून परत जाणे भाग पडले. कित्येक जणांचा झालेल्या हालाअपेस्टमुळे रस्त्यातच मरण

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

पावले तर काहींनी स्वतःची मालमत्ता विकून दक्षिणेत आले. असल्यामुळे पूर्ण उत्तरेस परत जाण्यापेक्षा दक्षिणेतच राहून उदरनिर्वाह करण्याचा निर्णय घेतला.

परिणामी त्यातूनच काही कुटुंबे दक्षिणेस तीरावली. इ.स.18 जून 1576 हा दिवस राजपुताच्या इतिहासाला एक वेगळी कलात्मक देणारा दिवस म्हणून काही इतिहासकार म्हणतात. कारण याच दिवशी हळदीघाटचे युद्ध लढले गेले होते. मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या राणा प्रताप आणि दिल्लीच्या तक्त्यावर मोगल साम्राज्याच्या विस्तारणी करण्याची स्वप्न पाहणारा बादशाह अकबरातील हा संघर्ष होता. या युद्धात अकबराच्या अफाट सैन्याच्या विरोधात राजपुतासह मध्य उत्तर भारतातील अनेक योद्धे राणा प्रतापाच्या नेतृत्वास लढण्यास सज्ज झाले होते. हे युद्ध म्हणजे राजपुताच्या दृष्टीने एक स्वातंत्र्य युद्धात होते. असे असले तरी अकबराच्या सेनेतही काही राजपूत युद्ध मोगलांच्या बाजूने लढले होते. अकबराच्या सेनेचे नेतृत्व मानसिंग कछवाह या राजपूत सरकारच्या खांद्यावर होते. त्यामुळे हे युद्ध म्हणजे एका अर्थाने राजपुताच्या विरोधातील दुसऱ्या राजपूताचे युद्ध ठरले. सम्राट अकबराणे यापूर्वी चित्तोडवर वर्चस्व प्राप्त केले असले तरी राणा प्रतापच्या नेतृत्वावर व पराक्रमावर बहुसंख्य राजपुताना विश्वास होता. मात्र या युद्धातील पराभवानंतर उरली सुरली आशाही धुळीस मिळाली. जवळजवळ सर्व राजपुतण्यावर मोगीलांचे वर्चस्व निर्माण झाले. राणा प्रताप काही निवडक सहकार्यासह अरवलीच्या दऱ्याखोऱ्यात निघून गेला मुळे काही राजपुतांनी मोघलांचे स्वामित्व पत्करणे ऐवजी तेथून निघून जाणे उचित समजले. उत्तरे सर्वत्र मोघलांचे साम्राज्य असल्यामुळे परिणामी त्यांनी दक्षिणेचा मार्ग स्वीकारला असावा.

महाराष्ट्रात आढळणाऱ्या गाडी, लोहारा समुदाय सुद्धा चित्तोडच्या पत्नानंतर स्थलांतरित होऊन दक्षिणेत आला होता. याच काळात काही राजपूत सुद्धा दक्षिणेत आले असावे तसे माननीय भाग पडते. कारण राजपूत, चव्हाण शेळीच्या नोंदी ठेवणाऱ्या भाटाकडील हस्तलिखित मध्ये ही बाब ठळकपणे नमूद आहे. त्यामुळे काही राजपूत कुटुंबही हळदीघाटाच्या युद्धानंतर खानदेशात मराठवाड्यात मध्ययुगीन धक्कांमध्ये आले असल्याचे त्यांच्या वंशावळीच्या आधारे स्पष्ट होते. सततच्या युद्धजन्य परिस्थिती पासून शांतता म्हणून स्थलांतर मध्ययुगीन कालखंडात उत्तर हिंदुस्तान सातत्याने राजकीय आणि लष्करी दडपणाखाली होता. सुलतानशाही नंतर मोगलशाही काळात अनेक युद्ध या भागात झालेली होती. राजकीय सत्ता स्तरासोबतच सातत्याने होणाऱ्या लष्करी वातावरणात सर्वसामान्य व्यक्तींना त्रास होणे सहभागी होते. त्यामुळेच उत्तरेकडील काही क्षत्रिय घराण्यातील लोकांनी स्थलांतर करून दक्षिणेकडे आश्रय घेतला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. राजपूत

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

समुदायातील भाटाकडील हस्तलिखितामध्ये उत्तर हिंदुस्तानातून उदाहरणार्थ रीवा, अवत्वालेर जाशी आधी बरीच कुटुंबे दक्षिणेत वास्तव्यास आल्याच्या नोंदी दिसून येतात. ही बाब सुद्धा दख्खननातील राजपुताच्या स्थलांतरास लागू पडते. कारण येथे वास्तवास असलेली बरीच कुटुंबाचे मूळ स्थान उपरोक्त प्रमाणे आढळून आलेले आहेत.

उत्तरेत आणि राजस्थानमध्ये वेळोवेळी पडणारा दुष्काळ इ.स.1396 पासून इ.स. 1408 पर्यंत उत्तर हिंदुस्थानात भीषण स्वरूपाचे बारा वर्षे दुष्काळ पडला होता. हा दुष्काळ दुर्गा देवीचे दुष्काळ म्हणून विख्यात आहे. सतत बारा वर्षापर्यंत पडलेल्या दुष्काळामुळे लोकांना मोठ्या प्रमाणात कष्ट सहन करावे लागले होते. या काळात पाऊस न पडल्याने पिके आली नव्हती. तद्वतच पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष झाले पर्यायाने अन्न पाण्याविना अनेकजण मृत्युमुखी पडले होते.[9] अशा भयंकर दुष्काळाच्या काळात उत्तर हिंदुस्तानात साथीच्या रोगाची लागवड झाली होती. या रोगानेही लाखो लोकांना बळी घेतला होता. या दुष्काळाच्या व साथीच्या रोगापासून स्वतःचा बचाव करण्याचे तुने उतरतील काही सरदार, जहागिरदार व सामान्य जनतेने नाईलाजाने अन्नप्रदेशात वास्तव्यात जाणे पसंत केले. या दुष्काळाच्या वेळी प्राण संरक्षणात वेगवेगळया भागात केलेल्या सुखी यांची मूळ ओळख जवळपास नाहीशी झाली. इ.स.1961 मध्ये मेवाडत पडलेल्या दुष्काळाने मेवाडतच काय पण संपूर्ण राजस्थानात हाकार माजवला. कर्नल जेम्स स्टॉड यांनी या संदर्भात लिहून ठेवले आहे की या काळात अजिबात पाऊस न झाल्याने अन्नधान्याची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली आणि गरीब लोक भुकेमुळे व्याकुळ होऊ लागले. भुकेमुळे व्याकुळ झालेल्या लोकांनी सुखी यांना सोडून अन्न टिकत ठिकाणी आश्रय घेतला.[10] हा दुष्काळ म्हणजे मेवाडच्या सामाजिक स्वास्थ्यावर परिणाम करणारा ठरला.

इ.स. 1868 राजपुताना मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडलेला असताना हौजा या राजपुताच्या जनजीवनावर परिणाम पडला. भयंकर दुष्परिणाम राजपुताच्या जन जीवनावर पडला या रोगामुळे राजपुताना हजारो लोक मृत्यू पावले. यावरून या दुष्काळाच्या प्रभावामुळे जवळपास सात ते आठ लाख लोक मेले किंवा अन्नद्रवस्थापित झाले असल्याचे स्पष्ट होते. ही परिस्थिती विचारात घेता वरील नैसर्गिक आपत्तीच्या काळात काही व्यक्ती व कुटुंब ही मराठवाड्यात वास्तव्यास आली असणे शक्य आहे. दौलताबाद आणि औरंगाबादचे वाढलेले महत्त्व लक्षात घेता अहमदनगरचे निजामशाही राज्य निस्तनाबूत करून ते मोगल अधिपत्याखाली आणले व दक्षिणेचा नवा सुभा निर्माण करून औरंगाबाद येथे नव्या सुभेची योजना केली होती. त्या काळात औरंगाबाद मध्ये बावनपुरे निर्माण झाले होते. उदाहरणार्थ जयसिंगपूरा, कर्णपुरा, भावसिंपुरा, नवापूर, पदमपुरा आधी औरंगाबाद मध्ये त्याकाळी

अनेक राजपूत सरदार यांनी त्यांच्या सैनिकासह यात निघून गेली होती त्याचाही परिणाम त्यांच्या मराठवाड्यात ही स्थलांतरावर झाला.

औरंगाबाद हे मध्ययुगीन कालखंडात महत्त्वाचे राजकीय आणि लष्करी ठिकाण असल्यामुळे मोगल बादशहा सरदार, जहागीरदार सैनिक यांचा औरंगाबाद मध्ये दीर्घकाळ मुक्काम असे. या शहरात विविध भागात त्यांच्या छावण्यास आहे. त्या छावण्यामध्ये अनेक निघून गेली अनेक सरदारांनी व सैनिकांमध्ये औरंगाबाद मध्ये त्यांची जीवन यात्रा संपवल्याच्या नोंदी मिळतात. उदाहरणार्थ द्यावयाचे झाल्यास बूंदी नरेश भाऊ सिंह यांनी औरंगाबादतच शेवटचा श्वास घेतला.[11] विविध राजपूत राजांचे औरंगाबाद मध्ये अनेक वर्षे वास्तव होते. या शहरात असलेली विविध स्मारके उदाहरणार्थ बिकानेर नरेश यांच्या महालाचे अवशेष, मिर्झाराजे सिंहाची छत्री, विविध सरदार व सैनिकाच्या छत्र्या विविध पुरे या भूप्रदेशात राजपुताच्या उपस्थितीची साक्ष देतात.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. जोशी महादेव शास्त्री, ‘भारतीय संस्कृती कोश’ खंड सहावा, भारतीय संस्कृती कोश मंडळ पुणे, 1998 पृष्ठ क्र. 191.
2. महाजन टी.टी, ‘खानदेशाचा राजकीय सांस्कृतिक इतिहास’ कॉन्टिटीनेंटल प्रकाशन, पुणे ,1998 पृष्ठ क्र. 151.
3. उपरोक्त, पृष्ठ क्र. 152.
4. परदेसी नरसिंह, ‘खानदेशातील राजपुताचा इतिहास’, सुद्धा प्रकाशन जळगाव, 2012 पृष्ठ क्र. 105.
5. उपरोक्त, पृष्ठ क्र. 106.
6. ओझा गौरीशंकर हिराचंद, ‘उदयपूर राज्य का इतिहास’ राजस्थानी ग्रंथागार जोधपुर ,1996 पृष्ठ क्र.190.
7. परदेसी नरसिंह, ‘खानदेशातील राजपुताचा इतिहास’ सुद्धा प्रकाशन जळगाव, 2012 पृष्ठ क्र. 108.
8. देगलूरकर गो. ब. ‘दुर्गम दुर्ग देवगिरी’ पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय मुंबई, 1999 पृष्ठ क्र 7.
9. ओझा गौरीशंकर हिराचंद, ‘उदयपूर राज्य का इतिहास’ राजस्थानी ग्रंथकार जोधपूर ,1996 पृष्ठ क्र. 442.
10. चौधरी की. का, ‘जळगाव जिल्हा दर्शनीका विभाग’ सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई ,1994 पृष्ठ क्र. 283.
11. टॉड जेम्स (अनुवाद) कालूराम शर्मा, ‘राजस्थान का इतिहास’ श्याम प्रकाशन जयपुर, 2004, पृष्ठ क्र. 197.